ISBN-0971-2156
Vol-12 Issue-03
Impact Factor(2020)- 5.24


| | | | |
|---|---|---|---|
| 22 | औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या कामगार स्त्रियांच्या समस्या | प्रा.डॉ.एस.एस.मानकर<br>प्रिती किशोर ढेपे | 73 |
| 23 | बुद्ध तत्त्वज्ञानातील नैतिक शिक्षण आणि पंचशीलाचे महत्त्व | डॉ. बाळासाहेब बा. लिहिणार.<br>वनामाला देविदास श्रीसुंदर | 75 |
| 24 | पर्यायी करप्रणाली असणारा केंद्रीय अर्थसंकल्प | प्रा.डॉ.भगवान सांगळे | 77 |
| 25 | अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि साहित्य | डॉ. विनोद उपर्वट | 81 |
| 26 | हाडकी हाडवळा' या दलित कादंबरीतून अभिव्यक्त झालेला स्त्री जीवन संघर्ष | प्रा. डॉ. मनोहर सिरसाट<br>सुजाता जगन्नाथ वागुल | 83 |
| 27 | मंटो जिंदा है !(मंटो की कहानियों में सामाजिक चित्रण) | डॉ.काळे नवनाथ पुंजाराम | 89 |
| 28 | महिपतीबाबा ताहरावादकर यांनी केलेले संत तुकारामांविषयींचे लेखन | प्रा. बालासाहेब विष्णु कटारे | 91 |
| 29 | कवीश्वराचार्य - भास्करभट्ट बोरीकर | प्रा. डॉ. माधुरी म. पाटील | 94 |
| 30 | निरोगी जीवनशैली | प्रा. विजय यशवंत देशमुख | 96 |
| 31 | आंबेडकरी चळवळीचा महाकवी-वामनदादा | प्रा.डॉ. मनोहर सिरसाट | 99 |
| 32 | काळा पैसा आणि त्याचे भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम | प्रा. मनोज सरोदे | 102 |
| 33 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे ग्रामसुधारणा विषयक विचार | प्रा.संदीप परदेशी | 105 |
| 34 | Need of Gandhi's Gram Swaraj | Bhaskar Kasote | 108 |


Scanned with CamScanner

ISBN-0971-2156
Vol-12 Issue-03
Impact Factor(2020)- 5.24

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे ग्रामसुधारणा विषयक विचार

**प्रा.संदीप परदेशी**
सहाय्यक प्राध्यापक,
पदवी व पदव्युत्तर, मराठी विभाग,
बलभीम महाविद्यालय, बीड.

**प्रस्तावना-**

महाराष्ट्राला थोर अशी संतांची परंपरा लाभलेली आहे.संत ज्ञानेश्वरांपासून ते आधुनिक संत गाडगे महाराज व संत तुकडोजी महाराजांपर्यंत ही परंपरा येते. संतांनी समाजाचा विरोध, संताप सहन करून येथील माणसाला सामाजिक ऐक्याचा संदेश दिला. **"अवघे विश्वचि माझे घर"** हा जयघोष कायम तेवत ठेवून या मंडळींनी समाजसुधारणांचे कार्य केले. अशा थोर परंपरेतील एक महान नाव म्हणजे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज.

तत्कालीन राष्ट्रपती डॉ.राजेंद्र प्रसाद यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे राष्ट्र विषयक कार्याचा गौरव करताना त्यांना **'राष्ट्रसंत'** ही उपाधी दिली. तुकडोजी महाराज यांचे पूर्ण नाव 'माणिक बंडोजी ठाकूर' असून त्यांचा जन्म ३० एप्रिल १९०९ रोजी विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील 'यावली' या गावी झाला. बालपणापासूनच त्यांना अध्यात्माची ओढ असल्याकारणाने ते ताडोबा अभयारण्यात ध्यान लावून ईश्वर चिंतन करून सतत विचार करत की गुलामगिरीत पडलेल्या माझ्या मातृभूमीला मुक्त केले पाहिजे. या विचारांमधून ते देवभक्तीकडून देशभक्तीकडे वळाले व राष्ट्रीय भजने करू लागले. लोकशिक्षकाचे महत्त्वाचे कार्य त्यांनी या भजनांच्या माध्यमातून केले. लोक त्यांना 'तुकडोजी महाराज' म्हणून संबोधू लागले.

नागपूर- अमरावती मार्गावरील 'मोझरी' या गावाजवळ १९३५ मध्ये त्यांनी 'गुरुकुंज' आश्रमाची स्थापना केली. या ठिकाणी त्यांनी ग्रामोद्योग, व्यायामशाळा, गोरक्षण, कृषीकेंद्र, दवाखाना, प्रशिक्षण विद्यालय, वसतिगृह असे विविध विभाग सुरू केले.

ढोल, शंख, खंजिरी, एकतारी या वाद्यांच्या तालावर भजने व कीर्तने करून धर्म जागृतीचे कार्य केले. १९४२ च्या चले जाव आंदोलनात त्यांनी समाजासाठी स्फूर्तीदायी भजने ही गायली. त्यांनी मोठ्या प्रमाणात साहित्यसंपदा लिहिली. यात ३२ मराठी व २६ हिंदी ग्रंथ असे एकूण ५८ ग्रंथ त्यांचे प्रसिद्ध आहेत. या सर्वामध्ये महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे **"ग्रामगीता"**.

या ग्रंथातील ४१ अध्यायांमधून त्यांनी ग्रामीण समाज, ग्रामीण माणूस, अध्यात्म, संसार, परमार्थ, वर्णव्यवस्था, सेवा सामर्थ्य, ग्रामरक्षण, ग्रामसिद्धी, श्रम संपत्ती, जीवनशिक्षण, ग्रामीण कुटुंब, महिलोन्नती अशा वेगवेगळ्या विषयावर पद्यमय भाषेत विचार मांडले आहेत.

स्वराज्याचे व सुराज्याचे यथोचित भान ठेवून ग्रामसुधारणेसाठी तळमळीने झटणारे खरेखुर्या राष्ट्रसंताने समाजाची बांधणी करणाऱ्या विचारांना सतत प्राधान्य दिले. आजच्या वैज्ञानिक काळात समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी ग्रामगीतेतून त्यांनी मांडलेला आहे. या ग्रामसुधारणा विषयक विचारांचा थोडक्यात आढावा पुढील प्रमाणे घेतलेला आहे.

**ग्रामगीतेचा उद्देश-**

गावाची सर्वांगीण सुधारणा करणे, देशातील गावांची सुधारणा करायची, आदर्श गाव निर्माण करायचे आणि गावागावातून कृतीयुक्त सुधारणा अपेक्षित असल्याचा ग्रामगीतेचा उद्देश आहे.



Scanned with CamScanner

ISBN-0971-2156
Vol-12 Issue-03
Impact Factor(2020)- 5.24

**ग्रामसुधारणा विषयक विचार-**

गावातून वाईट गोष्टींना नष्ट करण्यासाठी चांगल्या लोकांचे संघटन आवश्यक असल्याचे तुकडोजी महाराज सांगतात. तसेच गावच्या रक्षणासाठी ग्रामरक्षण दलांचीही आवश्यकता सांगितली.

"ग्राम सुधारणेचा मूलमंत्र। सज्जनांनी व्हावे एकत्र।
संघटना हेचि शक्तीचे सूत्र। ग्रामराज्य निर्माण करी।।"

तसेच त्यांनी व्यसनमुक्त समाज हेच प्रगतीचे प्रमुख लक्षण असल्याचेही म्हटले आहे.

"दारु, गांजा, भांग,अफीम । जुगार वेश्यादी वाईट काम ।
याचे उरु न द्यावे नाम। आपल्या गावी।।"

गावातील छोटे छोटे उद्योग मोडकळीस आले. त्यामुळे माणसे शहराकडे वळली. कच्चामाल शहरात आला आणि खेड्यांना अवकळा आली. याविषयी राष्ट्रसंत लिहितात-

"कच्चामाल मातीच्या भावे । तो पक्का होता चौपटीने घ्यावे ।।"

यामधून शेतकऱ्यांचे शोषण त्यांनी मांडलेले आहे. गावातील लोकांनी आळस झटकून श्रम केले पाहिजे. एकमेकांना सोबत घेऊन चालण्याची भावना जोपासली पाहिजे. सर्व दृष्टीने सक्षम बनण्यासाठी माणसाने एखादी स्वावलंबन कला जोपासली पाहिजे. यातून सर्वांगीण विकास साधला जाऊन जीवन सुंदर बनवता येते. महात्मा गांधींच्या विचारांचा अंश राष्ट्रसंताच्या लेखनामध्ये जाणवतो.

गाव सुंदर दिसण्यासाठी गावात वृक्षलागवड, बगीच्या, परिसर स्वच्छता, शौचालय, या बाबींवर विशेष भर दिला पाहिजे. या बरोबरच गावाला योग्य दिशा देण्यासाठी काही मंडळींची निर्मिती करावी. त्यांनी श्रमाचे महत्त्व, सांडपाण्याची व्यवस्था, शोषखड्डे, रस्त्याच्या दोन्ही बाजूला झाडे, कचराकुंड्या झाल्या याचे प्रामुख्याने नियोजन करावे. त्यामुळे गावाचे आरोग्य चांगले राहण्यास निश्चित मदत होईल. गावालगतचे तलाव, नदी, स्वच्छ ठेवून त्या पाण्याचा उपयोग पिण्यासाठी व शेतीसाठी करून घ्यावा. गाव आणि परिसराबरोबरच घरेही स्वच्छ ठेवणे गरजेचे आहे. घरात हवा खेळती हवी. गावात रस्ते स्वच्छ हवे, पथदिवे, आठवडी बाजार, मनोरंजनाची सोय, विश्रामगृह, विहीर, सुंदर शाळा, भिंतीवर सुविचार, व्यायामशाळा, वाचनालय या सुखसोयी ही चांगल्या पद्धतीने असाव्यात. श्रमशक्ती आणि बुद्धीच्या बळावर गावाचे नंदनवन झाल्याशिवाय राहत नाही. हा दृढनिश्चय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना वाटतो.

"हात फिरे तिथे लक्ष्मी शिरे । हे सूत्र ध्यानी ठेवोनी खरे ।
आपुले ग्रामची करावे गोजिरे । शहराहूनी ।।"

याबरोबरच राष्ट्रसंत पुढे सांगतात की, तरुणांनी खेड्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे. गाव हीच आपल्या जगण्यासाठी उत्तम कर्मभूमी असून आपल्या जन्मगावात आपण आपल्या नोकरीसाठी बौद्धिक कौशल्याचा वापर केला पाहिजे. प्रत्येक व्यक्तीला एखादी तरी कला अवगत हवी. प्रत्येकाने गावातच नव्या कला शिकून घ्याव्यात. त्यामुळे गावाची व आपोआप स्वतःची ही प्रगती होणार आहे. याविषयी राष्ट्रसंत म्हणतात-

"अहो! जीवनाची एक तरी कला । असावी लागते मानवाला ।
तरी तो मानव शोभला । नाहीतरी कल्ला जीवनाचा ।।"

आज खेड्यातून बलुतेदारी परंपरा नाहीशी झाली. परंतु आज त्या व्यवसायाशी समान आधुनिक व्यवसाय गावात सुरु केला तर नक्कीच तरुणांना उद्योगाचे नवे साधन मिळेल.

**शेतीविषयी** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सल्ला देतात की, शेतीला जोडधंदा म्हणून गाईचा सांभाळ केला पाहिजे. मलमुत्राचा शेतीसाठी उपयोग करावा. पूर्वी उत्तम शेती, मध्यम व्यापार व कनिष्ठ नोकरी हे सूत्र होते. परंतु आज काळ बदलला त्याबरोबर समाजधारणाही बदलल्या. आज उत्तम नोकरी, मध्यम व्यापार व कनिष्ठ शेती चे



Scanned with CamScanner

सूत्र झाले आहे. याला कारण आपल्याकडील अस्मानी-सुलतानी संकटे आहे. पारंपारिक शेती करण्याची पद्धत, दुष्काळ, सरकारची उदासीनता, अशी वेगवेगळी कारणे यासाठी आहेत. या कारणांचा आढावा घेऊन राष्ट्रसंत ग्रामगीतेतून लिहितात की, शेतकऱ्यांची दैनावस्था बदलण्यासाठी तरुणांनी एकत्र येऊन ग्रामसुधारण्याची जबाबदारी स्वीकारावी. तरुणांनी आपल्या शेती या मुख्य व्यवसायाला पूरक लघु उद्योग करावा. तसेच गावातून अंधश्रद्धा, व्यसनाधीनता यांना हद्दपार करावे.

**महिला उन्नती विषयक विचार-**

राष्ट्रसंतांनी ग्राम विकासात स्त्रियांचे महत्त्व जाणले होते. म्हणूनच स्त्रियांना शिक्षणाची प्रेरणा देण्यासाठी महिलोन्नती मधून प्राचीन काळातील स्त्री जीवनापासून आजपर्यंत आधुनिक स्त्री जीवनाचा पोषक विचार मांडला आहे. ढासळलेल्या नीतिमूल्यांची बलात्कार, हत्या, आत्महत्या, भ्रष्टाचार, विकृत मानसिकता, चंगळवाद अशा दूषित समाजव्यवस्थेत स्त्रीचा कोंडमारा आजही होत आहे. याची जाणीव राष्ट्रसंतांचा लागली असावी म्हणून त्यांनी म्हटले-

"जेव्हा पुरुष पावतो पतना | त्यास सी प्रकृती सहन होईना |
तेव्हा महिलात असावी संघटना | त्यांची सुधारणा करावया ||"

ग्रामविकासात ज्या योजनांचा अंतर्भाव व्यक्त केला आहे त्यातील स्त्री शक्ती विशेष उल्लेखनीय आहे. कारण हे स्रीयांच्या सहकार्याने शक्य आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्राम उद्धारासाठी, ग्राम स्वच्छतेसाठी ग्रामगीतेच्या माध्यमातून अनेक प्रकारचे विचार मांडले आहेत. यात स्त्री शिक्षण, वाचनविषयक, शैक्षणिक, शेती, शेतकरी विवाह, संस्कार, धार्मिक विचार, आरोग्य, दलित संवेदन, आदिवासी विचार, अंधश्रद्धा निर्मूलन, ग्राम संघटन, ग्रामीण नेतृत्व, ग्रामस्वच्छता, महिलांची उन्नती, सामाजिक विचार, साहित्यविषयक विचार असे वेगवेगळे विचार ग्रामगीता या ग्रंथातून त्यांनी मांडले आहे.

**सारांश-**

एकूणच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे कार्य संपूर्ण मानवजातीसाठी दिशादर्शक आहे. माणूस केंद्रस्थानी ठेवून त्यांनी हे सर्व कार्य केले आहे. गावाचा विकास म्हणजेच देशाचा विकास यासाठी त्यांनी स्वच्छतेचा संदेश दिला आहे. सर्वसामान्यांना आपापल्या गावी सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याचा संदेश ते देतात. स्वयंपूर्ण खेड्याचे स्वप्न त्यांनी पाहिले आणि ते बनवण्याचा ही प्रयत्न केला. सर्वाभूती प्रेम, दया, समता, शांतीचा संदेश त्यांनी दिला. "हे विश्वची माझे घर" या न्यायाने, नीतीने आणि उक्तीने व कृतीने आपल्या ग्रामगीतेतील ग्रामोद्योगातून ग्राम विकासाचा महान असा मूलमंत्र त्यांनी दिला. यातूनच त्यांच्या कार्याचे मोठेपण दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ-**

१. संपा.प्रमोद नलावडे, 'माझ्या स्वप्नातील आदर्श गाव ', राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, लोकराज्य अंक, एप्रिल-२०१२,
२. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, 'ग्रामगीता' , श्रीगुरुदेव ग्रामगीता प्रतिष्ठान, अ.भा.श्रीगुरूदेव सेवा मंडळ, गुरूकुंज आश्रम, जि.अमरावती, आवृत्ती पंधरावी, ऑक्टोबर २००५.
३. संपा. अक्षयकुमार काळे, 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज: व्यक्ती आणि वाङ्मय', विसा बुक्स, नागपूर, प.आ.२००८.
४. प्रा.राम घोडे, 'ग्रामगीता: गद्यसार', राजीव प्रकाशन, नागपूर, प्र. आ.१९८४.



Scanned with CamScanner